**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वाहिदअली गेसुदराज पटेल
२५, मौलाली चौक, हाजीमलंग दर्ग्यामागे, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष कार्यकारी अधिकारी,
सोलापूर महानगरपालिका, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सार्वजनिक आरोग्य अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, जि.सोलापूर — उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष कार्यकारी अधिकारी,
सोलापूर महानगरपालिका, जि.सोलापूर श्री.अनिल सदानंद विपत

**जन माहिती अधिकारी** तथा सार्वजनिक आरोग्य अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, जि.सोलापूर श्री.मोहन सिद्राम कांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.५.२००८ |
| ८ | माहिती मागणीच्या अर्जाची (मूळ अर्ज) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्याने दि.२८.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता सुनावणीला गैरहजर होते.

आपण मागितलेल्या कागदपत्रांवर अपेक्षित असलेले महानगरपालिका आयुक्तांचे शेरे दिसून येत नाहीत. त्यामुळे आपण मागितलेली माहिती मिळालेली नाही, असे अपीलकर्ता श्री.वाहिदअली गेसुदराज पटेल यांनी राज्य माहिती आयोगाकडील अर्जात व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे.

श्री.पटेल यांनी मागितलेली माहिती देण्यास सार्वजनिक निवडणुकानंतर विभागीय कार्यालयाचे ठिकाण बदलल्यामुळे, कागदपत्रे उपलब्ध होऊन मिळण्यास लागलेल्या अवधीमुळे विलंब झाला. मात्र अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार सर्व संचिका त्यांना दाखविण्यात आल्या. तथापि, मागणी केलेल्या कागदपत्रांमधील माहिती मान्य नसल्याचे सांगून त्यांनी ती घेण्यास नकार दिला. 'संबंधितांवर कारवाई करावी', असा महानगरपालिका आयुक्तांचा शेरा असलेल्या कागदपत्रांच्या प्रतीसह सर्व माहिती नि:शुल्क देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा सार्वजनिक आरोग्य अभियंता, सोलापूर महानगरपालिका, जि.सोलापूर श्री.मोहन सिद्राम कांबळे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. ते लक्षात घेता माहिती देण्याबाबत योग्य कार्यवाही करण्यात आल्याचे दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२१.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.बशीर अ.करीम शेख
एम. आय जी. ३५, म्हाडा घरकूल, हैद्राबाद रोड,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रादेशिक उपसंचालक,
वस्त्रोद्योग, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** प्रभारी व्यवस्थापक,
भारत सहकारी गारमेंट मर्यादित
१४५/१, मुबिना कॉम्पलेक्स, रेल्वे लाईन्स, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००८ |
| ३ | **उपस्थिती :-**<br><br>**अपीलकर्ता : -** श्री.बशीर अ.करीम शेख<br>एम.आय. जी. ३५, म्हाडा घरकूल, हैद्राबाद रोड, सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथाः-** प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग, सोलापूर<br>श्री. ए. एन कुंभार<br><br>**जन माहिती अधिकारी तथा :-** प्रभारी व्यवस्थापक भारत सहकारी गारमेंट मर्यादित,<br>१४५/१, मुबिना कॉम्प्लेक्स, रेल्वे लाईन, सोलापूर<br>श्री. अ. लतिफ म. उमर मायनबादकर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.६.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

भारत सहकारी गारमेंट संस्था स्थापन झाल्यापासून ते दि. १५.१.२००८ पर्यंतच्या बोर्ड मिटींगच्या इतिवृत्तांची छायाप्रत व सन २००६ - ०७ मध्ये सर्वसाधारण सभा का घेतली नाही, याची माहिती न मिळाल्याने अपीलकर्ता श्री. बशीर अ. करीम.शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

वरील माहिती दि. १९.११.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्त्याने स्वीकारली आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. कर्मचा-यांची कमतरता, अपीलकर्त्याची विस्तृत माहितीची मागणी आदी कारणे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केली असून ती लक्षात घेता विलंब क्षमापित करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२८.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.सुदाम गणपती डोईफोडे
(२)श्री.चंद्रकांत भिकोबा पवार
स.नं.२२/१, श्रीदत्त अपार्टमेंट,फ्लॅट नं.३०७,
तिसरा मजला, बालाजीनगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी,
पुणे शहर, शासकीय दायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा निबंधक, हवेली क्र.१,
खडकमाळ आळी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)श्री.सुदाम गणपती डोईफोडे
(२)श्री.चंद्रकांत भिकोबा पवार
स.नं.२२/१, श्रीदत्त अपार्टमेंट,फ्लॅट नं.३०७, तिसरा मजला, बालाजीनगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी,
पुणे शहर, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे श्री.सी.बी.भुरकुंडे

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा निबंधक, हवेली क्र.१, खडकमाळ आळी, पुणे
श्री.म.शं.कदम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.११.२००६ व २८.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१५.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२४.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सन २००६ पासून आपण दस्ताची प्रमाणित प्रत / मूळ प्रत मिळण्यासाठी अर्ज केला असूनही मूळ दस्त मिळत नाही. शोध घेण्यात येत असल्याचे वारंवार सांगितले जाते, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सुदाम गणपती डोईफोडे व श्री.चंद्रकांत भिकोबा पवार यांनी केले. श्री.डोईफोडे व श्री.पवार यांनी मागणी केलेला दस्त सन १९८८ चा असून त्याचा शोध घेण्यात येत आहे व त्याबाबतची कल्पना अपीलकर्त्यांना वेळोवेळी देण्यात आली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.१, खडकमाळ आळी, पुणे श्री.म.शं.कदम यांनी केले. मूळ दस्ताचा शोध घेऊन अपीलकर्त्यांना देण्याची कार्यवाही करावी लागेल. त्यानुसार पूर्तता केली जाईल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर श्री.सी.बी.भुरकुंडे यांनी केले.

अपीलकर्त्यांनी त्यांच्याकडील अनुषंगिक कागदपत्रे संबंधित दस्ताची पूर्तता करण्याकामी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना सादर करावीत व जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.१, खडकमाळ आळी, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर यांनी उक्त दस्तऐवजाच्या दुय्यम प्रतीवरून दस्त तयार करून त्याची नोंदणीकृत प्रत अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपीलकर्त्यांशी वेळावेळी संपर्क साधण्याचा प्रयत्न प्रत्यक्ष कर्मचारी पाठवूनही

करण्यात आला. तथापि त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही व त्यांनी कोणतीही कागदपत्रे सादर केली नाहीत, असे जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.१, खडकमाळ आळी, पुणे श्री.म.शं.कदम यांनी दि.१.१२.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.सुभाष शंकर बावकर
मु. पो. नातेपुते, ता. माळशिरस,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

विरूध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा**
गटविकास अधिकारी, पंचायत समिती माळशिरस,
जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत नातेपुते,
ता. माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२०/ सोलापूर |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.१९.११.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.५.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.४.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०.९.२००७ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. १९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपिलकर्त्यास माहिती मिळाली. परंतु आपल्या शेतीच्या नुकसान भरपाई पोटी दरवर्षी रू. ५०,०००/- प्रमाणे रक्कम मिळावी, अशी मागणी त्यांनी प्रपत्रात नमूद केली आहे.

अपीलकर्त्यांने योग्य शुल्क न भरणे, देऊ केलेली माहिती नाकारणे आदिंचा उल्लेख जन माहिती अधिकारी व अपिलिय प्राधिकारी यांनी प्रपत्रात व अन्य कागदपत्रांत केला आहे. तो लक्षात घेता व शेतीच्या नुकसानभरपाईचा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसल्याने आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.दत्तात्रय परमेश्वर तळेकर
मु. पो. केम, ता. करमाळा, जि. सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी बार्शी, जि. सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,उपविभाग जेऊर,
ता. करमाळा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३९/ सोलापूर |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.१९.११.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.१.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३१.५.२००८ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** शाखा कार्यालय, कंधार व उप विभाग, जेऊर येथील वीज पुरवठयाबाबतची माहिती. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत होऊन दि. १९.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती देऊन सदर माहितीची पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२२.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.गोपाळ आप्पा कुंभार
नवी कुंभार गल्ली, कैकाडी महाराज मठाजवळ,
पंढरपूर, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

विरूध्द

१) **अपिलीय प्राधिकारी तथा**
प्रादेशिक सह संचालक (साखर),
पुणे विभाग, शिवाजीनगर पुणे

**उत्तरवादी**

**१) जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी संचालक,
पांडुरंग सहकारी साखर कारखाना, श्रीपुर,
ता. माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७८/ सोलापूर |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.१९.११.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.७.२००७ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.९.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.३.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२२.४.२००८ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** पांडुरंग सहकारी साखर कारखान्याकडून मार्च २००६ ची साखर मिळाली नाही. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

पांडुरंग सहकारी साखर कारखाना, श्रीपूर ता. माळशिरस कडून मार्च २००६ ची साखर मिळाली नसल्याने अपीलकर्ता श्री. गोपाळ आप्पा कुंभार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अपीलकर्त्याची मागणी  ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २२.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. दगडू गणपत सुरवसे
जुनी मिल गृह निर्माण सोसायटी,
मुरारजी पेठ, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

१) **अपिलीय प्राधिकारी तथा**
सहायक आयुक्त (म.)
सोलापूर महानगरपालिका सोलापूर

**उत्तरवादी**

**१) जन माहिती अधिकारी तथा**
कर आकारणी व कर संकलन प्रमुख,
सोलापूर महानगरपालिका सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९८/ सोलापूर |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.१९.११.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.६.२००८ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.६.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दाखल केले नाही. |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्याने श्री. माने यांच्या नोटीसची प्रत व नोंद झाल्याच्या कागदपत्राच्या पुराव्यांच्या नकला अपीलकर्ता श्री. दगडू गणपत सुरवसे यांना देऊन पूर्तता अहवाल १५ दिवसांत आयोगाला सादर करण्यात येईल, असे जन माहिती अ धिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले होते.

त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा कर आकारणी व कर संकलन प्रमुख, सोलापूर महानगरपालिका यांनी अपीलकर्त्याची पोच दि. १.१२.२००८ या निवेदनाव्दारे आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २२.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर अनंत कुलकर्णी
११६, किल्ला विभाग करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (सा.प्र.वि.),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, करमाळा नगरपरिषद,
ता.करमाळा, जि.सोलापूर — उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शंकर अनंत कुलकर्णी
११६, किल्ला विभाग करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (सा.प्र.वि.),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे श्री.प्रकाश पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, करमाळा नगरपरिषद,
ता.करमाळा, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.रणजित कांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.१.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.५.२००८ |
| ८ | माहिती मागणीच्या अर्जाची (मूळ अर्ज) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

करमाळा नगरपरिषदेकडील शॉपिंग सेंटरच्या गाळ्यांच्या संदर्भातील संदर्भातील माहिती १४ दिवस उशिराने व अपुरी दिली, तीही चुकीची आहे, अनेक मुद्दयांबाबत रेकॉर्ड उपलब्ध नाही, असे उत्तर दिले आहे. नगरपरिषदेच्या गाळ्यांसाठी ज्यांनी अनामत रक्कम दिली नाही व ज्यांनी भाडे भरले, त्यांनी अनामत रक्कम दिली नाही असे उत्तर दिले आहे. गाळ्यांच्या लिलावाची जाहिरात कोणत्याही वर्तमानपत्रात दिली नाही, तसेच लिलावाबाबतची माहितीही दिली नाही. गाळे फुकट वापरले जातात, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.शंकर अनंत कुलकर्णी यांनी केले. श्री.कुलकर्णी यांना वस्तुस्थितीनुसार योग्य माहिती देण्यात आली. सिटी सर्व्हेची मोजणी झालेली नाही, तसेच गाळ्याबाबत करार झालेला नसल्याने तसे कळविले, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, करमाळा नगरपरिषद, ता.करमाळा, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.रर्णाजत सुधाकर कांबळे यांनी केले. श्री.कुलकर्णी यांना देण्यात आलेल्या शॉपिंग सेंटरलगत त्यांची स्वतःची जागा असून रस्त्याबाबतचा वाद दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहे. ही बाब न्यायालयीन व प्रशासकीय स्वरूपाची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याची दखल घेता येत नाही. गाळ्यांच्या भाड्याच्या वसुलीची कार्यवाही चालू आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.वि.), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांनी केले.

अपीलकर्ता यांना संबंधित अभिलेखाचे अवलोकन करू द्यावे व आवश्यक कागदपत्रांच्या प्रतींसह समक्ष स्पष्टीकरण द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. मात्र यानुसार आपल्याला माहिती न मिळाल्याची तक्रार श्री.कुलकर्णी यांनी दि.४.४.२००९ व दि.२०.५.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. शॉपिंग सेंटरच्या बांधकामापूर्वी नगरपालिकेने भूमापन कार्यालयाकडून अर्ज करून घेतलेल्या नकाशाची छायांकित प्रत आदि माहिती नगरपालिकेकडे उपलब्ध नाही, असे सांगितले जात असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी या पत्रामध्ये केली आहे. दि.१८.६.२००९ च्या पत्रान्वये आयोगाने या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, करमाळा नगरपरिषद, ता.करमाळा, जि.सोलापूर यांचा खुलासा मागविला. श्री.कुलकर्णी यांना नगरपरिषदेकडील अभिलेखांच्या आधारे दोनवेळा माहिती देण्यात आली. आयोगाच्या सूचनेनंतर दि.२५.६.२००९ रोजी नगरपरिषदेत त्यांना बोलावून वस्तुस्थिती स्पष्ट करण्यात आली. शॉपिंग सेंटरचे काम चालू करतेवेळी नगरपरिषदेने नगरभूमापन कार्यालयाकडे अर्ज दिलेला नव्हता. मोजणी झालेली नसल्यामळे मोजणीचा नकाशा व उतारा उपलब्ध नाही, हे त्यांना पुन्हा स्पष्ट करण्यातआले. आणखी काही माहिती हवी असल्यास ती देण्याची तयारी दर्शविली, परंतु नसलेल्या कागदपत्रांची ते मागणी करीत आहेत. अन्य माहिती घेण्यास नकार देऊन ते निघून गेले, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, करमाळा नगरपरिषद, ता.करमाळा, जि.सोलापूर निशिकांत परचंडराव यांच्या दि.१५.७.२००९ च्या अहवालान्वये आयोगास सादर केले. ते लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे

**पुणे**
**दि.११.१२.२००९**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.दिगंबर डी.भोसले
सर्व्हे नं.३०/अ/२/१ व स.नं.३१/१/२,
दौलतनगर सहकारी गृहरचना संस्था, धनकवडी, पुणे ४११ ०४३ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय क्र.४, पुणे महानगरपालिका, पुणे-५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४७/२००७/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.०८.२००८ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.दिगंबर डी.भोसले
सर्व्हे नं.३०/अ/२/१ व स.नं.३१/१/२,
दौलतनगर सहकारी गृहरचना संस्था, धनकवडी, पुणे ४११ ०४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय क्र.४, पुणे महानगरपालिका, पुणे-५

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ------- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१५.११.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>दौलतनगर को.ऑप.हौ.सोसायटी स.नं.३०, हिस्सा नं.२/१ ब, स.नं.३२ हिस्सा नं.२/१ धनकवडी येथील रस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाकडील मंजूर ले-आऊट प्लानप्रमाणे आहेत का? जर ले-आऊट प्लानमध्ये दुरुस्ती असेल तर दुरुस्त प्लान महानगरपालिकेकडे आहे का? या रस्त्यावर सोसायटीच्या सभासदांनी अतिक्रमण केले आहे का? असल्यास त्यांना नोटिसा दिल्या आहेत का? |
|---|---|

## सुधारित आदेश

**वाचा :** आयोगाचा समक्रमांकाचा आदेश दि.११.०५.२००९

श्री. दिगंबर डी.भोसले यांच्या अपिलावर राज्य माहिती आयोगाने पारित केलेल्या दि.११.०५.२००९ आदेशामधील अ.क्र.२(१) येथे जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका श्री.मकरंद कुलकर्णी यांना रु.६८००/- व सदर आदेशातील अ.क्र.३ येथे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका श्री.मदन आढारी यांना रु.२४,०००/- इतकी शास्ती लावण्यात आलेली आहे.

तथापि श्री.भोसले यांच्या माहितीच्या अर्जाच्या कालावधीत आपण जन माहिती अधिकारी नव्हतो, असे श्री.मकरंद कुलकर्णी यांनी त्यांचे दि.०९.०६.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत करुन शास्ती रद्द करण्याची विनंती केली आहे. तसेच या प्रकरणाच्या संपूर्ण कालावधीमध्ये कधीही जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता म्हणून आपण कार्यरत नव्हतो, असे श्री.मदन आढारी यांनी त्यांचे दि.०३.०६.२००९ चे पत्रान्वये आयोगास अवगत करुन शास्ती रद्द करण्याची विनंती केली आहे.

यास्तव, आयोगाने दि.३.०७.२००९ च्या पत्रान्वये नगर अभियंता कार्यालयाकडून प्रस्तुत प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी म्हणून कोण दोषी आहे त्यांच्या नावासह कालावधी निहाय खुलासा मागविला. त्यानुसार नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी त्यांच्या दि.२४.०७.२००९ रोजीच्या पत्रान्वये या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांचा तपशील पुढीलप्रमाणे सादर केला आहे :

| कालावधी | जन माहिती अधिकारी |
| --- | --- |
| १) दि.४.०६.२००७ ते १९.०७.२००७ | श्री.शांताराम ख. थोरात (विकास अभियंता) |
| २) दि.२०.०७.२००७ ते पुढे | श्री.प्रविण वा. गेडाम (नगर उपअभियंता) |

तसेच, सदर प्रकरणामध्ये शास्ती करण्यात आलेले श्री.कुलकर्णी प्रत्यक्षात दि.१०.०७.२००८ पासून जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत आहेत व श्री.मदन आढारी हे दि.१.१०.२००७ पासून अपिलीय प्राधिकारी म्हणून काम पाहत आहेत, असेही नमूद केले आहे.

नगर अभियंता कार्यालयाचे उपरोक्त स्पष्टीकरण विचारात घेऊन श्री. कुलकर्णी व श्री.आढारी यांची शास्ती रद्द करण्याची विनंती मान्य करण्यात येत असून त्यानुसार आयोगाचा सुधारित आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

आयोगाच्या दि.११.०५.२००५ रोजीच्या आदेशात अंशत: बदल करण्यात येत असून तो खालीलप्रमाणे:

१) सदर आदेशातील अ.क्र.२(१) मध्ये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्री.मकरंद कुलकर्णी यांना लावण्यात आलेली शास्ती रु.६८००/- व अ.क्र.३ मध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी म्हणून श्री.मदन आढारी यांना लावण्यात आलेली शास्ती रु.२४,०००/- रद्द करण्यात येत आहे.

२) (अ) नगर अभियंता कार्यालयाने सादर केलेल्या तपशीलानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका श्री.शांताराम ख.थोरात यांना मूळ अर्जाच्या तारखेपासून तीस दिवस वजा जाता दि.१९.०७.२००७ पर्यंत १५ दिवसांच्या विलंबाबद्दल (२५०X१५) रु.३७५०/- आणि

(ब) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता श्री.प्रविण वा.गेडाम यांना मूळ अर्जापासून तीस दिवस वजा जाता व त्यांचे नियुक्ती दिनांकापासून (दि.२०.०७.२००७) ते दि.१०.१०.२००७ पर्यंत ८२ दिवसांचे विलंबाबद्दल (२५०X८२) रु.२०,५००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

३) मूळ अर्ज सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार पाच दिवसांत पाठविला नाही, ३३ दिवसांनी तो अर्ज सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग यांच्याकडे दि. १७.७.२००७ रोजी पोहोचला. त्यांनी दि. १.८.२००७ रोजी माहिती दिली. झालेल्या विलंबाला नगर अभियंता कार्यालयातील कर्मचारी जबाबदार आहेत व ते शास्तीस पात्र ठरतात. अशा कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांना विहिती मुदतीचे ३० दिवस वजा जाता २८ दिवसांच्या विलंबाबद्दल (२५०X२८) = रु. ९,०००/- ऐवजी रु. ७,०००/- शास्ती लावावी.

४) शास्तीची रक्कम संबंधितांच्या डिसेंबर २००९ च्या जानेवारी २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा,६०, इतर सेवा, ८०० इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांनी करावी. तसेच याबाबतची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन तसा पूर्तता अहवाल आयोगास दि. १५.१.२०१० सादर करावा.

५) संबंधित जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांची नावे, त्यांचा कार्यकाल आदि नेमका तपशील संबंधित अधिकाऱ्यांनी दिला पाहिजे. या प्रकरणी उपस्थित अधिकाऱ्यांनी ही जबाबदारी पार पाडली नाही, याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे. तसेच यापुढे याबाबत दक्षता न घेतल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल,याची जाणीव आयुक्त, पुणे महानगरपालिका, यांच्यामार्फत महानगरपालिकेच्या सर्व विभागांना देण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : ७ / १२/२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ.सिंधू किसनराव बारभाई
मु.पो.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
मावळ उपविभाग, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, मुळशी,
तहसील कार्यालय मुळशी, पौड, ता.मुळशी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
मावळ उपविभाग, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे श्री.संजयसिंह चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, मुळशी,
तहसील कार्यालय मुळशी, पौड, ता.मुळशी, जि.पुणे प्रतिनिधी श्री.विकास शरद भालेराव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१७.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्त्या सौ.सिंधू किसनराव बारभाई यांच्या मागणीनुसार स्पष्टीकरणात्मक माहिती आठ दिवसात देण्याबाबत अपीलकर्त्याशी चर्चा झाली असून त्यांनी ते मान्य केले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, मुळशी(पौड), ता.मुळशी, जि.पुणे यांचे प्रतिनिधी श्री.विकास शरद भालेराव यांनी केले. त्यानुसार पूर्तता करून अहवाल सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने दिले. तहसीलदार, मुळशी यांना आयोगाने केलेल्या विचारणेनंतर दि.३०.११.२००९ रोजी त्यांनी अहवाल सादर केला. श्रीमती बारभाई यांना संबंधित विषयाच्या चर्चेसाठी बोलावले होते, परंतु त्या आल्या नाहीत. नंतरच्या काळात लोकसभा निवडणूक व विधानसभा निवडणूक व अधिकाऱ्यांच्या बदल्या यामुळे मूळ आदेशानुसार कार्यवाहीस व अहवाल सादर करण्यास विलंब झाला, असे निवेदन तहसीलदार, मुळशी श्री.भाऊसाहेब जाधव यांनी या अहवालात केले आहे. तसेच सौ.बारभाई यांनी केलेल्या मूळ तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहितीही त्यांना देण्यात आल्याचे अहवालात नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.१४.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

डॉ. संदीप विठ्ठल रोहकले — अपीलकर्ता
मु.पो. पिंपळवडी, ता. जुन्नर, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा लेखाधिकारी, लेखापरीक्षण पथक, पुणे जिल्हा — उत्तरवादी
११, सिनेग्राम स्ट्रीट, पुणे-१

**जन माहिती अधिकारी** तथा कनिष्ठ लेखापरीक्षक, लेखापरीक्षण पथक, पुणे जिल्हा
११, सिनेग्राम स्ट्रीट, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.२.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** डॉ. संदीप विठ्ठल रोहकले<br>मु.पो. पिंपळवडी, ता. जुन्नर, जि. पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा लेखाधिकारी, लेखापरीक्षण पथक, पुणे जिल्हा<br>११, सिनेग्राम स्ट्रीट, पुणे-१<br>श्री. पुंडलिक गंगाराम पायधन<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कनिष्ठ लेखापरीक्षक, लेखापरीक्षण पथक,<br>पुणे जिल्हा ११, सिनेग्राम स्ट्रीट, पुणे-१<br>श्री. विजयकुमार प्रल्हाद सोनवणे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.९.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेल्या माहितीत मूळ कागदपत्रांमध्ये बदल करून जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लेखापरीक्षक, लेखापरीक्षण पथक, पुणे यांनी सुभाष विद्या मंदिर पिंपळवंडी, ता. जुन्नर या प्रशालेतील हितसंबंधितांशी संगनमत करून खोटी कागदपत्रे दिली. माहितीच्या अधिकारातील अर्ज दिल्यानंतर कागदपत्रात फेरफार केला आहे, अशी तक्रार अपीलकर्ता डॉ. संदीप विठ्ठल रोहकले यांनी केली.

डॉ. रोहकले या विषयात सातत्याने अर्ज व विविध स्वरूपाचा पत्रव्यवहार करीत आले आहेत. वेळोवेळी त्याना मूळ कागदपत्रानुसार माहिती देण्यात आली आहे. प्रशालेकडून आलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना देण्यात आल्या आहेत. आपण अथवा अन्य अधिकाऱ्यांनी त्यात फेरफार करण्याचा व खोटी कागदपत्रे करण्याचा प्रश्न येत नसून हा आरोप खोटा आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लेखापरीक्षक, लेखापरीक्षण पथक, पुणे श्री. पुंडलिक गंगाराम पायधन यांनी केले.

डॉ. रोहकले यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विशेष चौकशी करून मुख्याध्यापकांकडून सत्य प्रती करून देण्यात आल्या. सर्व कागदपत्रे शाळेकडील असून आपल्या कार्यालयाकडील नाहीत. अधिकाऱ्यांच्या समोर कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढून सत्य प्रती घेऊन दिल्या आहेत. या शिवाय चौकशी झाली त्याच दिवशीची ही कागदपत्रे आहेत. खोटी कागदपत्रे करणे इत्यादी आरोप निराधार आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा लेखाधिकारी, लेखा परीक्षण पथक, पुणे श्री. विजयकुमार प्रल्हाद सोनवणे यांनी केले.

मूळ हजेरी पत्रकातील बदल, लेखा परीक्षण तपासणीच्या दरम्यान मूळ प्रतीत केलेला फेरफार, सादर केलेल्या लेखा परीक्षण अहवालात उल्लेख नसलेल्या प्रती पुरविणे, अनेक मुद्दयांचे सखोल विश्लेषण आवश्यक असताना न करणे इ. आक्षेप डॉ. रोहकले यांनी लेखी निवेदनात नोंदविले आहेत. तथापि या बाबी प्रशासकीय कार्यवाहीशी संबंधित असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तसेच मूळ कागदपत्रे बदलून खोटी कागदपत्रे तयार करण्यात आली, या आरोपाची शहानिशा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येणार नाही. आवश्यक वाटल्यास अपीलकर्ता त्याबाबत उचित न्यायासनाकडे तक्रार नोंदवू शकतात. अभिलेखातील कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास देण्यात आल्या असून मूळ अभिलेखानुसार त्या असल्याचे जन माहिती अधिकारी तथा

कनिष्ठ लेखापरीक्षक, लेखापरीक्षण पथक, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा लेखाधिकारी, लेखा परीक्षण पथक, पुणे यांनी ते प्रमाणित केले.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ११ .१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ